# राग व सूड यांच्या पलीकडे

*भारत सरकारनं आपल्याच जनतेमधील एका घटकाविरोधात सुरू केलेल्या युद्धाला आळा कसा घालायचा?*

भारतातील अंतर्गत युद्धांमध्ये दोन्ही बाजूंनी मृत्युमुखी पडणारे लढवय्ये (आणि लढ्यात सामील नसलेले) हे आपलेच लोक आहेत. २४ एप्रिल २०१७ रोजी सुकमा (छत्तीसगढच्या दक्षिण भागामध्ये) इथं झालेल्या चकमकीत केंद्रीय आरक्षित पोलीस दलाच्या (सेंट्रल रिझर्व पोलीस फोर्स: सीआरपीएफ) ७४व्या तुकडीतील २५ जवानांनी जीव गमावले, त्यापूर्वी २३ ऑक्टोबर २०१६ रोजी माल्कनगिरी (ओडिशा) इथं माओवादी पक्षाच्या पीपल्स लिबरेशन गुरीला आर्मीच्या २४ बंडखोरांना आंध्र प्रदेशच्या 'ग्रेहाउन्ड' पथकाच्या कारवाईत जीव गमवावे लागले होते. यातील सीआरपीएफच्या जवानांच्या मृत्यूविषयी बडी प्रसारमाध्यमं आणि सरकार यांच्या प्रतिक्रिया उन्मादाच्या व चीड व्यक्त करणाऱ्या होत्या, तर ओडिशामधील घटनेवेळी या घटकांच्या प्रतिक्रियांमधून अत्यानंद ओसंडत होता. परंतु आता प्रतिक्रियांचा गदारोळ शांत झाल्यावर भारतीय राज्यसंस्था आणि माओवादी यांच्यातील या अंतर्गत युद्धाबद्दल विचार करण्याची गरज आहे. माल्कनगिरी चकमकीमध्ये माओवादी बंडखोरांवर अचानक हल्ला झाला होता आणि त्यात त्यांच्यातील २४ जणांना प्राण गमवावे लागले. सुकमामध्ये गेली ३ ते ५ वर्षं सीआरपीएफची दलं तैनात आहेत, या दीर्घ काळामध्ये काही त्रुटींमुळं त्यांना प्राणघातक हल्ला सहन करावा लागला.

डाव्या कट्टरतावाद्यांच्या प्रभावाखाली असलेल्या प्रदेशांमध्ये कायद्याचं राज्य आणि राज्यघटनात्मक सुव्यवस्था आणण्यासाठी आपण 'डाव्या कट्टरतावाद्यां'शी लढतो आहोत, असा दावा सरकार करतं. परंतु सरकारी विधानांमध्ये 'युद्धजन्य' परिस्थिती, 'सैनिकी कारवाई', 'प्रदेश वर्चस्व' व 'रस्ते खुले करणारं पथक' असे शब्दप्रयोग वारंवार होत असतात. 'नक्षलवादी गुन्ह्यां'चा आरोप असलेल्या आणि बस्तरमधील कोंडी झालेल्या तुरुंगात खितपत पडलेल्या स्थानिक आदिवासींना सहाय्य करणारे वकील, बातमीदार, आणि सामाजिक व राजकीय कार्यकर्ते यांना पोलीस त्रस्त करत आहेत. बस्तर परिसरातील सरकारी दलांची संख्या ८० हजारांच्या आसपास आहे, तर माओवादी बंडखोरांची (स्त्री व पुरुष मिळून) संख्या केवळ चार हजार आहे. म्हणजे दोन्ही बाजूंच्या संख्याबळाचं प्रमाण १:२० इतकं आहे. खरं तर बस्तरमध्ये सुरू असलेल्या चकमकी म्हणजे 'निम-पारंपरिक युद्ध'च आहे. भारतीय राज्यसंस्थेची दलं आणि माओवादी बंडखोर यांच्यातील हे युद्ध आहे. यात राज्यसंस्था केवळ माओवाद्यांशी लढत नाहीये, तर आदिवासी नागरिक आणि त्यांच्या मदतीला येत असलेल्या कोणालाही सरकार लक्ष्य करत आहे. म्हणजे सरकार स्वतःच्याच जनतेमधील एका घटकाविरोधात हे बीभत्स युद्ध लढत आहे, पण यात युद्धाचे नियम मात्र लागू होत नाहीत आणि कायद्याचे नियम तिथं अस्तित्त्वात नाहीत.

'युद्ध म्हणजे निराळ्या माध्यमांतून केलेलं राजकारणच असतं', ही उक्ती खरी मानली तर आपल्याला पुढील प्रश्न विचारावा लागेल : हे युद्ध लढत राहण्यामागचं माओवाद्यांचं व भारत सरकारचं राजकारण कोणकोणतं आहे? सरकार 'विकास' आणू पाहात आहे आणि माओवादी त्यामध्ये अडथळे निर्माण करत आहेत, असं या प्रश्नावरचं अधिकृत उत्तर आहे. 'विकास' या शब्दाचा सरकारचा अर्थ वनांमधून रस्ते बांधणं, शाळा व आरोग्यसुविधा पुरवणं, इत्यादी आहे. पण रस्ते सोडून इतर कोणत्याही कामाला माओवाद्यांनी विरोध केल्याचा पुरावा नाही. रस्त्यांमुळं सरकारी दलांच्या हालचाली सुलभ होतात, त्यामुळं माओवादी या कामांमध्ये अडथळे आणतात. या वनांमधून माओवाद्यांना बाजूला सारल्याशिवाय देशात खाणकामासाठीची थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करता येणार नाही, असं माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी स्पष्टपणेच सांगितलं होतं. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं एक पाऊल पुढं टाकलं आहे. 'छोटानागपूर कूळ अधिनियम, १९०८'मध्ये दुरुस्ती करण्याला सरकारनं पाठिंबा दिला आहे, त्यामुळं आत्तापर्यंत या अधिनियमानं झारखंडमधील आदिवासींना मिळत असलेलं संरक्षण संपुष्टात येईल. शिवाय, 'अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वनोपजीवी (वनहक्क मान्यता) अधिनियम, २००६'मधील सामुदायिक वनहक्कांनाही मोदी सरकारनं बाजूला सारलं आहे. छत्तीसगढच्या उत्तर भागामध्ये कोळसा खाणींचं काम सुरू करायला खाजगी कंपन्यांना मुभा देऊन सरकारनं या हक्कांची पायमल्ली केली आहे. वनांमधून अमर्याद रस्तेबांधणीमुळं वनपट्ट्याची हानी झाली आहे. पश्चिमी सिंघभूम प्रदेशातील सारंदा वनांमध्ये सीआरपीएफनं १७ निमसैनिकी छावण्या उभारल्या, त्यानंतर खुल्या लोहखनिज खाणकामासाठी खाणकंपन्यांचा प्रवेश इथं झाला.

या सगळ्या घडामोडी आपल्याला कोणत्या दिशेनं घेऊन जात आहेत? सुकमा हल्ल्यात झालेल्या जीवितहानीबद्दल आपण जरूर दुःख व्यक्त करायला हवं, कारण आपले बहुतांश सैनिकही कष्टकरी वर्गातून आणि गरीब शेतकरी कुटुंबांमधून आलेले असतात. या चकमकीत मृत्यू पडलेले जवान आणि माल्कनगिरी कारवाईत मृत्युमुखी पडलेले माओवादी बंडखोर यांच्यातल्या पार्श्वभूमीत हे साम्य दिसतं. परंतु जवान आणि बंडखोर यांच्यातल्या लढण्याच्या प्रेरणा आणि आकांक्षा मात्र पूर्णपणे भिन्न स्वरूपाच्या आहेत. सीआरपीएफमध्ये जवान म्हणून दाखल होणाऱ्या व्यक्तीला चांगल्या उपजीविकेची आस असते. याउलट माओवादी दलांमध्ये सामील होणाऱ्या लोकांना पगाराची काहीही चिंता नसते. आपल्या समुदायाची जमीन आणि वनं बळकावली जाऊ नयेत यासाठी, या वनांचं व जमिनींचं रक्षण करण्यासाठी ते लढायला प्रेरित झालेले असतात.

आपल्यापैकी बहुतेकांना हे युद्ध संपावं असं वाटत असेलच, पण हे घडायचं असेल तर बस्तरमधील व इतर ठिकाणांमधील आदिवासींच्या रागाचं कारण आपण शोधायला हवं. या आदिवासींनी जमिनी आणि वनं वाचवण्याकरिता प्रतिरोधासाठी माओवाद्यांवर विश्वास का टाकला आहे, हेही आपण समजून घ्यायला हवं? माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री जयराम रमेश यांनी २०१३ साली अनुसूचित प्रदेशांमध्ये खाणकाम व औद्योगिक कामांना १० वर्षांची तहकुबी लावण्याचा प्रस्ताव ठेवला होता. सरकारनं आत्तापर्यंत कटाक्षानं ज्या वास्तवाकडं पाठ फिरवली आहे त्याला सामोरं जाण्यासाठी व त्यावर उत्तर शोधण्यासाठी या प्रस्तावासारखे प्रयत्न बहुधा सहाय्यकारी ठरतील. ●

# काश्मिरींच्या खांद्यावर आपले ओझे

*काश्मीरमध्ये समाजमाध्यमांवर सरकारनं बंदी आणली आहे, यावरून सरकारला सत्याची वाटत असलेली भीती दिसून येते.*

पूर्वीच्या काळी गैरमाहिती पसरू नये या हेतूनं अविचारी पद्धतीनं आशयप्रसिद्धीवर किंवा एखाद्या माध्यमावर बंदी घातली जात असे. पण आजचा काळ असा नाही. काश्मीरमध्ये समाजमाध्यमांवर महिन्याभराहून अधिक काळ बंदी आहे. तरुण काश्मिरींच्या निदर्शनांचे व्हिडियो पसरू नयेत, या निदर्शकांना संघटित होता येऊ नये, संदेशवहन थांबावे यासाठी ही बंदी घालण्यात आली आहे, हे उघड आहे.

सरकारची सेन्सॉरशिप आणि हिंसा यांचा अनुभव काश्मिरींच्या अख्ख्या पिढीला आहे. भारतीय राज्यसंस्थेकडं काश्मिरी कोणत्या दृष्टीनं पाहतात याचं वर्णन करणारी स्थानिक कथनं दाबण्यासाठी केंद्र व राज्य सरकारं कोणत्या थराला जाऊ शकतात हे आताच्या ताज्या बंदीवरूनही स्पष्ट होतं. काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणात सैन्य तैनात करण्यात आलेलं आहे, त्याचप्रमाणे हा नवीन आदेशही सार्वजनिक सुव्यवस्थेच्या नावाखाली नागरिकांची मुस्कटदाबी करण्यासाठी देण्यात आलेला आहे. काश्मिरींना त्यांच्याच 'तपासणी न केलेल्या आक्षेपार्ह आणि चिथावणीखोर आशया'पासून वाचवण्यासाठी हा आदेश देण्यात आला आहे. दगडफेक व निषेध दर्शवणारे व्हिडियो या गोष्टी 'समाजविरोधी' किंवा 'व्यापक समाजाच्या विरोधा'त जाणाऱ्या नाहीत, तर राज्यसंस्थेला विरोध दर्शवणाऱ्या आहेत, याकडं सरकार सोईस्कर दुर्लक्ष करत आहे.

शिवाय काश्मीरमधला कोणता 'तपासणी न केलेला आक्षेपार्ह' आशय सरकारनं गृहीत धरला आहे? ९ एप्रिल रोजी झालेल्या लोकसभेच्या पोटनिवडणुकीच्या दरम्यान, अनेक व्हिडियो प्रसृत झाले होते. या व्हिडियोंमधील चित्रं अस्पष्ट होती, अस्थिर होती, पण त्यातल्या लोकांच्या किंकाळ्या आणि गोळ्यांचे आवाज ऐकू येत होते. सुरक्षादलांसोबत स्थानिक जनतेचा संबंध कशा प्रकारे येत असतो, याचा अंदाज यावरून आपल्याला येऊ शकतो. पोलिसांनी थांबवून ठेवलेल्या रुग्णवाहिकेमधून आपल्या मृत भावाला घेऊन जाणाऱ्या १७ वर्षांच्या मुलानं 'फेसबुक लाइव्ह'च्या माध्यमातून प्रसिद्ध केलेला एक व्हिडियोही यात होता. दुसरा एक व्हिडियो २२ वर्षांच्या एका तरुणानं थेट प्रक्षेपित केला होता, त्यात बंडखोरांसोबत चकमक करत असलेल्या सुरक्षादलांवर दगडफेक करताना या कॅमेराधारी तरुणालाही गोळी लागलेली दिसली. सरकारनं स्वतःच्या संयमाच्या घोषणा केलेल्या असल्या तरी प्रत्यक्षातलं वर्तन मात्र याच्या उलट आहे, याचा पुरावा म्हणून तरुण काश्मिरी या व्हिडियोंचा वापर करायला लागले होते. परंतु मोठ्या प्रमाणावर भारतीय जनतेचं लक्ष मात्र एकाच व्हिडियोनं वेधून घेतलं होतं: या व्हिडियोमध्ये क्रालपोरा भागात सीआरपीएफच्या जवानांवर काश्मिरी लोक शेरेबाजी करत असल्याचं चित्रित झालं होतं.

समाजमाध्यमांचा अवकाश समपातळीवरचा असल्याचं वरकरणी वाटत असलं तरी त्यातही संख्याबळाचं प्रभुत्व दिसतं. हे प्रभुत्व प्रत्यक्षातील ताकदीसारखंच असतं, त्यामध्ये पैसा पुरवून आणि माहिती तंत्रज्ञानाचे विभाग वापरून बळ लादता येतं. सीआरपीएफच्या जवानांवरील शेरेबाजीचा 'व्हिडियो अस्सल असल्याचं आम्हाला तपासादरम्यान लक्षात

आलं', असं सीआरपीएफच्या निरीक्षकांनी तुलनेनं लगेचंच जाहीर केलं. मग, सैन्यदलांशी संबंधित इतर व्हिडियोंच्या बाबतीत अस्सलतेची अशी तपासणी का करण्यात आली नाही?

काही निरीक्षकांनी निदर्शनास आणल्यानुसार, सीआरपीएफच्या जवानांवरील शेरेबाजीच्या व्हिडियोमध्ये या जवानांना त्रास न देण्याची सूचना तरुणांना करणारे किमान चार स्थानिकांचे आवाजही ऐकू येत आहेत. या चलत्-चित्रांचं स्वरूप असं असतं की त्यात विविध पातळ्या दस्तावेजीत होतात, परंतु व्हिडियो 'शेअर' करून ग्रहण करण्याच्या सध्याच्या संस्कृतीत व्यापक माध्यमांमध्ये या सर्व पातळ्या संपुष्टात येतात.

तपासणीचा मुद्दा हा केवळ काळ्या-पांढऱ्या स्वरूपाचा खेळ नाही. जगभरात तणावग्रस्त प्रदेशांमधील अनेक लोकांनी समाजमाध्यमांचा वापर करून एखाद्या घटनेचं थेट प्रक्षेपण करण्याचा मार्ग वापरलेला आहे. 'व्हॉट्स-ॲप'चे व्हिडियो लोकांशी संवाद साधतात कारण त्यातून तत्काळ अस्सलतेचं सूचन होतं असतं आणि लोक ते सत्याशी जोडतात. 'मुख्य प्रवाहातील माध्यमां'च्या सत्याला प्रतिरोध करणं, ही प्रेरणा या व्हिडियोंचा प्रसार करण्याच्या मागं अनेकदा असते. राजकीय अवकाशाच्या कोणत्याही बाजूला असलेल्या आणि मुख्य प्रवाह म्हणजे काय याच्या विविध कल्पना असलेल्या लोकांमध्ये ही प्रेरणा आढळते. पण अस्सलतेच्या या बुरख्यामुळं हे व्हिडियो मुख्य प्रवाहाला प्रतिरोध करण्याच्या नावाखाली आणखी प्रचारतंत्रातच वापरले जाण्याची शक्यता जास्त असते.

अफवा पसरवणाऱ्या एखाद्या 'व्हॉट्स-ॲप' वापरकर्त्याच्या प्रगत रूपासारखं सरकारचं वर्तन असता कामा नये. स्वतःच्या विचारसरणीय कलानुसार आशयाच्या तपासणीबद्दल निर्णय घेणं आणि बाकीच्या बाजूंकडं दुर्लक्ष करणं, ही सरकारची भूमिका असणं योग्य नाही. गैरमाहिती पसरू नये, अशी काळजी खरोखरच वाटत असेल तर सरकारनं विविध पातळ्या आणि संदर्भ टिकून राहतील अशी यंत्रणा विकसित करण्यासाठी प्रयत्नशील असायला हवं. बनावट बातम्यांना सामोरं जाताना युरोपीय संघानं अशा प्रकारची यंत्रणा विकसित केलेली आहे. काश्मिरी निदर्शनांच्या प्रसृत झालेल्या व्हिडियोंमधील गैरमाहितीबद्दल सरकारला शंका होती, तर या व्हिडियोंमध्ये नक्की काय अयोग्य आहे हे सरकारनं आपल्याला सांगायला हवं. हे व्हिडियो फेरफार केलेले आहेत का, ते दुसऱ्या कुठल्या ठिकाणचे आहेत का, ते आधी कधीतरी तयार केलेले आहेत का, या प्रश्नांची उत्तरं शोधायला हवीत.

अशा अनेक प्रसारित व्हिडियोंची तत्काळ तपासणी मुख्य प्रवाहातील प्रकाशनंही करू शकत नाही. काही वेळा व्हिडियो जिथून आला ते ठिकाण दुर्गम असतं, किंवा त्यांचा संदर्भ स्पष्ट करणारी व्यवस्था उपलब्ध नसते, परंतु बहुतेक वेळा अशी तपासणी न करण्याचं कारण अधीरता आणि उत्तरदायित्वाचा अभाव हे असतं. अर्थात, साध्या उलट्या प्रतिमा शोधाद्वारे बनावट छायाचित्रांच्या प्रचंड साठ्याच्या मुळापर्यंत पोचता येतं, हे बनावट बातमीच्या स्वतंत्र शोधकांनी दाखवून दिलेलं आहे. पश्चिमेतील आघाडीच्या काही माध्यमसंस्थांनी अशा तपासणीव्यवस्था उभारलेल्या आहेत. परंतु, एखाद्या संदेशाचा पुढं प्रसार करण्यापूर्वी त्याची तपासणी करण्याच्या संस्कृतीला चालना देण्यासाठी सरकारी अधिकारी व राजकारण्यांनीही यातील काही मूल्यं आत्मसात करावी लागतील. हे घडत नाही. उदाहरणार्थ, भारतीय जनता पक्षाचे आमदार संगीत सोम यांनी बनावट व्हिडियो त्यांच्या फेसबुक पानावर शेअर केल्याचा आरोप आहे. मुझफ्फरनगरमध्ये २०१३ सालच्या दंगलींना भडकावण्यामध्ये या

व्हिडियोचा हातभार होता.

अधिकृत मौनामधील संगनमताचा कारभार आणि महत्त्वाच्या अधिकाऱ्यांनी व माहिती–तंत्रज्ञान विभागानं चालवलेला प्रचार यासंबंधीचे अडचणीचे प्रश्न टाळण्यासाठी सरकारनं समाजमाध्यमांच्या अस्ताव्यस्तपणाचा आधार घेऊ नये. अत्याचाराचा पुरावा म्हणून काश्मिरी जनतेकडून प्रसिद्ध होणाऱ्या व्हिडियोंची शहानिशा करता येत नसल्याचं कथन वारंवार करून सरकारनं सत्यामध्ये आपल्याला रस नसल्याचंच सिद्ध केलं आहे. ●

---

## मणिपूरचा संदेश

*बनावट चकमक प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानं नागरिकांच्या अधिकारांवर शिक्कामोर्तब केलं आहे.*

मणिपूरमधील बनावट चकमकींच्या प्रकरणात जुलै २०१६मध्ये सर्वोच्च न्यायालयानं अंतरिम निकाल दिला होता, त्याला आव्हान देणारी पुनर्विचार याचिका केंद्र सरकारनं दाखल केली होती, या याचिकेला सर्वोच्च न्यायालयानं अलीकडंच रद्द ठरवलं. सद्यस्थितीत केंद्र सरकार स्वतःच्या मतानुसार 'राष्ट्रीय' हिताच्या विरुद्ध जाणाऱ्या प्रत्येक विद्रोहाला शमवण्यासाठी अधिकाधिक बळाची मागणी करतं आहे, अशा वेळी सर्वोच्च न्यायालयानं सुनावलेले शहाणपणाचे बोल सरकारच्या युद्धखोरीला आळा घालण्यासाठी उपयुक्त ठरावेत. मुख्य न्यायमूर्ती जे. एस. शेखर यांच्या अध्यक्षतेखालील पाच न्यायाधीशांच्या खंडपीठानं दिलेल्या या निकालपत्रात सरकारवर ताशेरे ओढण्यात आले आहेत. 'अंतर्गत अशांतता ही युद्धजन्य परिस्थितीसारखी किंवा त्याच्या जवळ जाणारी असते, असं नाही', 'मणिपूरमध्ये युद्ध किंवा युद्धजन्य परिस्थिती असल्याचे गृहीत धरून कारवाई करू नये, तर तिथं अंतर्गत अशांतता आहे असं मानून राज्यघटनेमध्ये नमूद केलेल्या अर्थानुसार उपाय करावा', असं न्यायालयानं स्पष्टपणे सांगितलं आहे.

'एक्स्ट्राज्युडिशिअल एक्झिक्युशन विक्टिम फॅमिलीज् असोसिएशन' (ईईव्हीएफएएम) या मणिपूरमधील बिगरसरकारी संस्थेनं २०१२ साली दाखल केलेल्या रिट याचिकेवर न्यायालयानं २०१६ साली अंतरिम आदेश दिला होता, त्याला आव्हान देणारी पुनर्विचार याचिका केंद्र सरकारनं दाखल केली होती. ईईव्हीएफएएम या संस्थेनं नोंदवल्यानुसार २००० ते २०१२ या काळात १,५८२ न्यायबाह्य हत्या झाल्या. ईईव्हीएफएएमनं दाखल केलेल्या याचिकेमध्ये या हत्यासंबंधी स्वतंत्र चौकशीची मागणी केली होती. 'सशस्त्र दलं (विशेषाधिकार) अधिनियम, १९५८' (आर्म्ड फोर्सेस (स्पेशल पॉवर्स) ॲक्ट– अफस्पा, १९५८) या अंतर्गत 'अशांत प्रदेशा'मध्ये सुरक्षा दलांना शिक्षेपासून संरक्षण लाभल्यामुळं अटक, अत्याचार व हत्या यांच्या घटनांमधे वाढ झाल्याचं संस्थेनं म्हटलं होतं. याचिका दाखल करून घेतानाच सर्वोच्च न्यायालयानं न्यायमूर्ती एन. संतोष हेगडे यांच्या अध्यक्षतेखालील विशेष समितीला सहा प्रकरणांची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. ही सहाही प्रकरणं न्यायबाह्य हत्यांची आहेत, असा निर्वाळा समितीनं दिला.

या संदर्भात सर्वोच्च न्यायालयानं आता विशेष तपास पथकाचीही स्थापना केली आहे. या पथकामध्ये मणिपूरबाहेरचे वरिष्ठ पोलीस अधिकारी आहेत. याचिकाकर्त्यांनी सादर केलेल्या प्रकरणांचा तपास करायची जबाबदारी या पथकाकडं देण्यात

आली आहे. अफ्सा रद्द करावा यासाठी मणिपुरींकडून मोठ्या प्रमाणावर मागणी होत होती, इरोम शर्मिला यांनी त्यासाठी दीर्घकाळ उपोषणही केलं, या पार्श्वभूमीवर २०१४ साली केंद्र सरकारनं मणिपूरमधील परिस्थितीचं मूल्यमापन करण्यासाठी न्यायमूर्ती बी. पी. जीवन रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. 'मणिपूर व इतरत्र होत असलेल्या निदर्शनांसारख्या घटना हा केवळ रोगाचा परिणाम आहे आणि हा रोग खोलवर पसरलेला आहे', असं समितीनं म्हटलं होतं. अफ्सा रद्द करण्याची आणि 'बेकायदेशीर कृत्यं (प्रतिबंध) अधिनियम, १९६७'मध्ये (अनलॉफूल ॲक्टिव्हिटीज् (प्रिव्हेन्शन) ॲक्ट, (यूएपीए) १९६७) सुधारणा करण्याची शिफारस या समितीनं केली होती. परंतु या शिफारशींकडं लक्षच देण्यात आलं नाही.

सर्वोच्च न्यायालयानं २०१६ साली दिलेल्या आदेशाचा मुख्य संदेश कमकुवत करण्याचा प्रयत्न केंद्र सरकार करू पाहात होतं, परंतु न्यायालयानं हे प्रयत्न थोपवले आहेत. न्यायबाह्य हत्यांसाठी सुरक्षा दलांना उत्तरदायी धरण्यासंबंधी कोणतीही निःसंदिग्धता या निकालात ठेवलेली नाही. हा खटला मणिपूरशी संबंधित असला तरी त्याचे संदर्भ राज्याच्या हद्दी ओलांडणारे आहेत. 'नागरी प्रशासनाच्या सहाय्या'साठी सैन्याचा वापर केला जाऊ शकतो, परंतु असं 'अनिश्चित काळा'साठी करता येणार नाही, असं न्यायालयानं लख्खपणे सांगितलेलं आहे. 'प्रतिबंधाचा नियम मोडत अशांत प्रदेशामध्ये शस्त्र घेऊन वावरणारी व्यक्ती तेवढ्याच कारणावरून बंडखोर किंवा विद्रोही ठरवता येणार नाही', असं न्यायालयानं म्हटलं. याहून अधिक महत्त्वाचं निरीक्षणही न्यायालयानं नोंदवलं आहे: 'आपल्याच देशातील नागरिक 'शत्रू' आहेत अशा केवळ आरोपावरून किंवा संशयावरून त्यांना मारण्यासाठी आपण सशस्त्र दलांचे जवान तैनात करणार असू, तर केवळ कायद्याचं राज्यलाच नव्हे तर लोकशाहीलाही गंभीर धोका निर्माण होईल'. आजघडीला काश्मीर व छत्तीसगढमध्ये अगदी हेच होतं आहे, त्यामुळं न्यायमूर्ती मदन बी. लोकूर व न्यायमूर्ती उदय ललीत यांनी दिलेल्या निकालाचा संदेश अधिकाधिक प्रमाणात पसरवायला हवा.

बनावट चकमकींमध्ये सहभागी असलेल्या सुरक्षा दलांच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या कृतींसाठी उत्तरदायी ठरवल्यास 'एक हात पाठीमागं बांधून' लढायची वेळ त्यांच्यावर येईल, असा युक्तिवाद सरकारनं केला होता. परंतु न्यायालयानं हा युक्तिवाद मान्य केला नाही. अंतर्गत संघर्षामध्ये प्रत्यक्षात आपल्याच नागरिकांच्या विरोधात सरकार युद्धात गुंतलेलं असतं, परंतु एक हात बांधल्याचा सदर युक्तिवाद प्रत्येक वेळी केला जातो. संघर्षग्रस्त प्रदेशांमधील लोक मात्र दोन्ही हात पाठीमागं बांधून जगत असतात, या परिस्थितीकडं अशा वेळी दुर्लक्ष केलं जातं. मणिपूरमध्ये २३ लाखांच्या लोकसंख्येला सतत सैनिकी हस्तक्षेपात जगावं लागतं. सुमारे पाच हजार बंडखोरांवर चाप बसवण्यासाठी तिथं सैन्य तैनात करण्यात आलेलं आहे आणि या बंडखोरांचीही मुख्य कृती खंडण्या मिळवण्याचीच असल्याचं दिसतं. या पार्श्वभूमीवर अफ्सा किंवा यूएपीए यांना सतत अंमलात आणण्याचं समर्थन कसं करता येईल? काश्मीरमध्ये भारतीय राज्यसंस्थेच्या धोरणांमुळं स्थानिक जनतेमधील अनेक घटक– विशेषतः तरुण तुटलेपण अनुभवत आहेत, परंतु मणिपूरमध्ये लोकांनी आश्चर्यकारकरित्या राज्यसंस्थेच्या बाबतीत स्वीकाराची भूमिका ठेवलेली दिसते आहे, हे लक्षात ठेवायला हवं. निवडणुकांमध्ये सलग मोठ्या प्रमाणावर मतदार सहभागी होत असल्याच्या वस्तुस्थितीवरून हे सिद्ध होतं. सर्वसामान्य

मणिपुरींना त्यांचं जीवन शांततेत घालवायचं आहे, याचा हा पुरावा आहे हे भारतीय राज्यसंस्थेच्या ध्यानात येत नाही. उलट, सरकार तिथल्या नागरिकांना असं सांगताना दिसतं की, तुमच्या मतदानामुळं तुम्हाला नागरिकत्व मिळतं, परंतु आम्हाला राज्यसंस्था म्हणून मिळालेल्या सत्तेमुळं आम्ही तुम्हाला नागरिकत्व नाकारूही शकतो. अशा वेळी आपण संघर्षग्रस्त प्रदेशात राहात असलो किंवा नसलो तरी हा अनिष्ट संकेत देशातील सर्व नागरिकांना चिंतेचा वाटणं गरजेचं आहे. ●

---

## मर्यादित प्रशंसेस पात्र आदेश

*बाबरी मशीद प्रकरणात सर्वोच्च न्यायालयानं दिलेला आदेश व्यवस्थेतील मूलगामी प्रश्न सोडवणारा नाही.*

सर्वोच्च न्यायालयानं सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) पथ्यावर पडणारा आदेश दिला आहे. अयोध्येत उद्ध्वस्त बाबरी मशिदीच्या जागी राम मंदिर बांधण्याचा वादग्रस्त मुद्दा तापत राहील, अशी तजवीज न्यायालयानं केली आहे. अर्थात, २३ एप्रिल रोजी न्यायालयानं या प्रकरणी नवीन आदेश दिला तेव्हा त्यामागील हेतू असा नव्हता. सोळाव्या शतकातील बाबरी मशीद पाडण्यासाठी रचलेल्या कटाप्रकरणी लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी व उमा भारती या भाजपच्या वरिष्ठ नेत्यांसोबतच विध्वंस करणाऱ्या कारसेवकांविरोधात गेली २५ वर्षं सुरू असलेले दोन खटले एकत्र करावेत आणि लखनौमधील न्यायालयात त्यासंबंधी जलद गतीनं सुनावणी होईल, याची खातरजमा केंद्रीय अन्वेषण विभागानं (सीबीआय) करावी, असा आदेश सर्वोच्च न्यायालयानं दिला. परंतु आता भाजप याचा वापर करून सांप्रदायिक अस्थिरतेचा मुद्दा तापवत ठेवेल आणि २०१९च्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी हिंदू मतांना एकगठ्ठा बांधायचा प्रयत्न करेल.

जाणीवपूर्वक न घडवलेल्या या परिणामाचा भाग बाजूला ठेवला, तर सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशाचे महत्त्व आपण कसे समजून घ्यायला हवं? ६ डिसेंबर १९९२ रोजी शेकडो कारसेवक अयोध्येतील बाबरी मशिदीच्या घुमटावर चढले आणि पोलीस, पत्रकार व प्रोत्साहन देणारे राजकारणी यांच्यासमोरच मशीद उद्ध्वस्त करायची योजना अंमलात आणली. अडवाणी व इतरांविरोधात आणि ‘लाखो कारसेवकांविरोधात’ दाखल करण्यात आलेल्या दोन प्राथमिक माहिती अहवालांमधून काहीच निष्पन्न झाले नाही, कारण संबंधित खटल्यांमध्ये कित्येक सुनावण्या, तहकुबी व प्रतिआव्हाने देण्यात आली आणि अखेर निकालाच्या दिशेनं काही प्रगती झालीच नाही. या दोन खटल्यांचा कायदेशीर मार्ग पाहाता आपल्या गुन्हेगारीसंबंधित न्यायव्यवस्थेची किती दुरवस्था झाली आहे, ते पुन्हा एकदा स्पष्ट होतं. पण तरीही एका अर्थी सर्वोच्च न्यायालयाचा ताजा आदेश हा एक महत्त्वाचा हस्तक्षेप आहे. आत्तापर्यंत रायबरेली व लखनौमध्ये स्वतंत्रपणे सुरू असलेले दोन खटले एकत्र करायचे आदेश सीबीआयला देण्यात आले आहेत, शिवाय अनावश्यक तहकुबी किंवा न्यायाधीशांचा पदबदल होऊ नये आणि दोन वर्षांच्या आत निकाल द्यावा, असं सर्वोच्च न्यायालयानं आदेशात म्हटलं आहे. म्हणजे, या व्यवस्थात्मक समस्यांची न्यायालयानं दखल घेतली आहे.

या हस्तक्षेपासाठी आम्ही न्यायालयाची प्रशंसा करतो. परंतु ही प्रशंसा मर्यादित स्वरूपाचीच आहे, कारण कितीही महत्त्वाचा खटला असला तरी केवळ

तेवढ्या बाबतीत कृती करून आपल्या गुन्हेगारी न्यायव्यवस्थेला ग्रासून असलेल्या महाकाय समस्या सुटणार नाहीत. वारंवार होणारी तहकुबी आणि न्यायिक अधिकाऱ्यांची सततची पदबदली यांसारख्या न्यायव्यवस्थेतील गुंतागुंतीच्या प्रक्रियांमध्ये अडकून अक्षरशः हजारो खटले प्रलंबित आहेत. शिवाय, गलथानपणा करणारे सरकारी वकील आणि साक्षीदारांना संरक्षण नसणं यांमुळं महत्त्वाचे साक्षीदार साक्ष द्यायला बोलावण्यापूर्वीच आपल्या भूमिकेपासून मागं फिरतात. यातील काही समस्यांवर तोडगा काढला जात नाही, तोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या हस्तक्षेपासारख्या कृती अपवादच ठरत राहतील.

सर्वोच्च न्यायालयानं दिलेला हा आदेश एकमेवाद्वितीय नाही, हेही नोंदवणं गरजेचं आहे. २००४ साली बेस्ट बेकरी हत्याकांडाच्या (२००२च्या गुजरात दंगलींमध्ये बडोद्यात झालेली १४ लोकांची हत्या) खटल्यात सर्वोच्च न्यायालयानं हा खटला गुजरातेहून महाराष्ट्रातील जलदगती न्यायालयात स्थानांतरित केला होता. गुजरातेतील वातावरण दूषित व सांप्रदायिक बनलेलं आहे, त्यामुळं न्याय मागणाऱ्यांना सहाय्य करण्यास तिथली राज्ययंत्रणा सक्षम नाही, हे लक्षात आल्यानं त्या वेळी न्यायालयानं खटला स्थानांतरित केला होता. सत्यापर्यंत पोचण्यासाठी सक्रिय राहाणं हा न्यायव्यवस्थेचा हक्क आहे आणि 'अमूर्त तांत्रिक बाबींमुळं माघार घेण्या'ची गरज नाही, याची आठवणही सर्वोच्च न्यायालयानं या वेळी करून दिली होती. या तांत्रिक बाबींमुळंच बाबरी मशीद खटल्यात १९९७ साली पहिल्यांदा मोठा विलंब झाला होता. त्या वेळी, संबंधित दोन खटल्यांच्या सुनावण्या रायबरेली व लखनौ अशा दोन स्वतंत्र न्यायालयांमध्येच होणं गरजेचं आहे, असा निर्वाळा अलाहाबाद उच्च न्यायालयानं दिला होता.

आता सर्वोच्च न्यायालयानं हा मुद्दा पुन्हा प्रकाशात आणला आहे. त्या पार्श्वभूमीवर, बाबरी मशिदीच्या विध्वंसानंतरच्या २५ वर्षांमध्ये भारतावर काय परिणाम झाला याचं मूल्यमापन आपण करायला हवं. सप्टेंबर १९९०मध्ये अडवाणींच्या रथयात्रेपासून राम मंदिराच्या मुद्द्यावरील आंदोलन सुरू झालं, त्याचा शेवट डिसेंबर १९९२मध्ये बाबरी मशिदीच्या विध्वंसामध्ये झाला. या काळात भारताला कठोरपणे सांप्रदायिक धृवीकरणाच्या मार्गावर नेण्यात आलं. हिंदुत्ववादी शक्तींचा जोर वाढतच गेला, आणि २०१४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला मोठ्या प्रमाणात विजय मिळाला. हा जोर अजूनही कमी झालेला नाही, हे चालू वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या पाच राज्य विधानसभा निवडणुकांच्या निकालांमधूनही स्पष्ट झालं. बाबरी मशिदीच्या विध्वंसानंतर विविध ठिकाणी दंगली झाल्या. मुंबईत १९९२ साली व गुजरातमध्ये २००२ साली धार्मिक दंगली झाल्या. यामुळं आपण लोकशाही राष्ट्रातील समान नागरिक आहोत हा अल्पसंख्याकांच्या मनातील विश्वासही उद्ध्वस्त झाला. २०१४ सालापासून हे सांप्रदायिकतेचं विष वेगानं पसरत चाललं असून असुरक्षिततेच्या भावनेला त्यामुळं खतपाणी मिळतं आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळं भाजपमधील वरिष्ठ नेत्यांची झोप उडण्याची शक्यता नाही. उलट, त्यांच्या दृष्टीनं इतकी योग्य वेळ दुसरी कुठलीच नाही. उमा भारतींच्या विजयोन्मादी विधानावरून हे दिसून येतं. अडवाणी व इतरांवरील गुन्हेगारी कटाचा आरोप न्यायालयात सिद्ध झाला तरी त्यांना चिंता करण्याची काहीच गरज पडणार नाही, कारण त्यानंतर पुन्हा वरच्या न्यायालयांमध्ये दाद मागण्याचा मार्ग मोकळाच राहणार आहे. या प्रक्रियेत भाजपचाही लाभच होणार आहे. किंबहुना

सांप्रदायिक धृवीकरण झालेल्या वातावरणात, कोणताही परिणाम निवडणुकीतील लाभासाठी वापरला जाईल.

भारताच्या स्वातंत्र्योत्तर सांप्रदायिक इतिहासामध्ये विविध घटनांची नोंद झालेली आहे. त्यामध्ये ६ डिसेंबर १९९२ हा दिवस सर्वांत ठळकपणे दिसतो, कारण त्यातून हिंदुत्वाच्या राजकारणाला मोठी ऊर्जा मिळाली आणि ही ऊर्जा दिवसागणिक वाढतेच आहे. इथून पुढं दोन वर्षांनी लखनौ न्यायालयात दिला जाणारा निकाल या प्रक्रियेतील आणखी एक नोंद ठरेल, इतकंच.

●

---

## गायींचं रक्षण, माणसांची हत्या

*आपल्याला आश्वासन देण्यात आलेला 'नवा भारत' हाच आहे.*

अलवारमधील पेहलू खान या ५५ वर्षीय दुग्धउत्पादक शेतकऱ्याला गोरक्षकांनी– खरंतर त्यांना मारेकऱ्यांचा जमाव म्हणायला हवं– १ एप्रिल रोजी दिवसाढवळ्या जीव जाईपर्यंत मारलं. ऑक्टोबर २०१५मध्ये दादरी इथं मोहम्मद अखलाख यांच्या हत्येपासून सुरू झालेल्या गुन्हेमालिकेतील हा आणखी एक गुन्हा ठरला. गाईच्या नावाखाली केल्या गेलेल्या या हत्या आहेत. तेव्हापासून भारताच्या तथाकथित गो-पट्ट्यामध्ये भारतीय गायींच्या अधिकारांना भारतीयांच्या मानवाधिकारांहून अधिक प्राधान्य मिळत आहे. गायी वा म्हशींना घेऊन जात असलेल्या कोणावरही माग ठेवून, नंतर ही वाहतूक रोखून हल्ले केले जात आहेत. यात मुख्यत्वे मुस्लिमांना आणि काही प्रसंगांमध्ये दलितांना लक्ष्य केलं जातं, त्यांची हत्या केली जाते किंवा त्यांना गंभीर जखमी तरी केलं जातं. हे घडत असताना कायद्याचे रक्षणकर्ते बघ्याची भूमिका घेतात. या क्रूर कथेला आणखी घृणास्पद वळण देत पीडितांनाच अटक केली जाते आणि आक्रमकांना मोकळं सोडलं जातं किंवा 'अज्ञात व्यक्तीं'विरोधात गुन्हा दाखल केला जातो.

अखलाखच्या हत्येपासून गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, झारखंड, महाराष्ट्र व कर्नाटक यांच्यासह विविध राज्यांमध्ये गाईभोवती आक्रमक राजकारण सुरू झालं आहे. यातील कर्नाटक सोडून इतर सर्व राज्यांमध्ये भारतीय जनता पक्ष (भाजप) सत्तेत आहे. गोरक्षकांना गुन्हा करूनही मोकाट राहण्याची पळवाट मिळवून देणाऱ्या तरतुदी असलेले कायदे (उदाहरणार्थ– महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६) बदलण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेची सुनावणी सध्या सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. या याचिकेमध्ये नोंदवलेल्या सहा राज्यांव्यतिरिक्त मध्य प्रदेश व हरयाणामध्येही अशा घटना घडल्या आहेत आणि चालू वर्षी एप्रिलमध्ये जम्मू व काश्मीर आणि दिल्ली इथंही अशा घटना घडल्या. पेहलू खान यांच्यावरील जीवघेण्या हल्ल्याप्रमाणेच शेवटच्या दोन ठिकाणी घडलेल्या घटनांच्या चित्रफितीही उपलब्ध आहेत. जमावाच्या क्रौर्याचा आणि पोलिसांच्या निष्क्रियतेचा हा विश्वासार्ह पुरावा आहे. जम्मू-काश्मीरमध्ये भटक्या गुराख्यांवर झालेल्या हल्ल्याची चित्रफीत खासकरून हृदयद्रावक आहे. गायी पाळण्यासाठी उभारलेल्या कामचलाऊ बांधकामाला जमाव उद्ध्वस्त करत असताना एक आई आपल्या मुलांना वाचवण्याचा प्रयत्न करत असलेली या चित्रफितीमध्ये दिसते.

कोणत्याही सुसभ्य समाजामध्ये या घडामोडींबद्दल व्यापक संताप निर्माण होईल. पण भारतात, काही निषेधाचे सूर उमटले असले तरी

एकीकडे सरकारी मौन आणि दुसरीकडे या कृतींचं उघड समर्थन यांच्या गजबजाटात हे सूर निष्प्रभ ठरले आहेत. अलवारमधील घटनेबद्दल आपल्याला कोणतंही दुःख वाटत नसल्याचं राजस्थानातील भाजपचे आमदार ज्ञानदेव अहुजा म्हणाले. तर, राज्याचे गृह मंत्री गुलाबचंद कटारिया यांनी विधानसभेत सांगितलं की, पेहलू खान हे गाय तस्कर होते. मंत्र्यांच्या या खोटेपणाला पोलीसप्रमुखांनी उघड केलं. या प्रकरणी राज्यसभेत गहजब झाल्यावर आणि तेवीस माजी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तीव्र शब्दांतील निवेदन प्रसिद्ध केल्यावर मुख्यमंत्री वसुंधरा राजे सिंदिया यांनी मौन सोडलं. अशा प्रकारचा कोडगेपणा आणि ढोंग सत्ताधाऱ्यांनी बाळगलं असताना खान व त्यांच्या कुटुंबियांप्रमाणे सर्वसामान्य लोकांना कोणती आशा वाटावी?

हिंदुत्ववादी राजकारणासाठी गाय मध्यवर्ती असली तरी या प्रकरणांमध्ये गायीचा मुद्दा मध्यवर्ती नाही. सरकारसाठी गाय इतकी महत्त्वाची आहे की आता 'आधार'प्रमाणे गायींनाही ओळखपत्र देण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. हे अविश्वसनीय वाटत असलं तरी या संदर्भात सरकारनियुक्त मंडळाची अलीकडेच बैठक झाली. बांग्लादेशाला होणारा गायीगुरांचा बेकायदेशीर व्यापार थांबवण्यासाठी पॉलीयुरेथिननं बनलेले बिल्ले गुरांवर लावावेत, असं गृह मंत्रालयाच्या संयुक्त सचिवांच्या अध्यक्षतेखालील या मंडळानं ठरवलं आहे. सॉलिसिटर जनरलांनी ही माहिती सर्वोच्च न्यायालयाला दिली नसती, तर ही एखादी अफवा आहे किंवा 'बनावट बातमी' आहे, असा आपला समज झाला असता.

गुरांना ओळखीचे बिल्ले लावायचा हा निर्णय हास्यास्पद आणि निवडक न्यायाचा दाखला देणारा आहे. सरकारला सोईचं असेल तेव्हा कायद्याची अंमलबजावणी आणि राजकीय हेतूला सोईचं असेल तेव्हा कायद्याला धुडकावणी– अशा प्रकारची ही भूमिका खरोखरच दुर्दैवी आहे. काश्मीरमध्ये दगड फेकणाऱ्या आणि भारतीय राज्यसंस्थेपासूनच्या आपल्या तुटलेपणाची अभिव्यक्ती करणाऱ्या तरुणांना गुन्हेगार ठरवलं जातं. त्यांना अटक केली जाते, त्यांच्यावर गोळीबार केला जातो, मारहाण केली जाते आणि त्यांना मारूनही टाकलं जातं. परंतु, निरपराध मुस्लीम लोकांना मारणारे, कायदा हातात घेणारे गोरक्षकांचे हिंसक जमाव मात्र कर्तव्य पार पाडणारे देशभक्त ठरतात. किंबहुना राजस्थानातील आघाडीच्या 'गोरक्षिका' साध्वी कमल दिदी यांनी पेहलू खानच्या मारेकऱ्यांची तुलना उघडपणे भगत सिंग व चंद्रशेखर आझाद यांच्याशी केली आहे.

हे स्पष्टपणे पक्षपातीपणाचे संदेश आहेत. अल्पसंख्याकांना काय वाटतं किंवा त्यांचे विचार काय आहेत याची फिकीर न करणारं हे सरकार या देशातील लोकशाही व्यवस्थेच्या भवितव्यासमोरचा खरा धोका आहे. आधीच विखंडित असलेल्या या समाजाच्या चिरफळ्या उडवण्यासाठी मोठ्या प्रमाणातील धार्मिक दंगलीच गरजेच्या आहेत, असं नाही. आपल्या गुन्ह्याबद्दल बडेजाव दाखवणारा गोरक्षकांचा जमाव समाजातील दरी वाढवत असतो. अलवार, दिल्ली, दादरी, लातेहार, उना, सोनेपत, मंदसौर, किंवा इतरत्र घडलेल्या घटना या सुट्यासुट्या स्वरूपाच्या नाहीत. नरेंद्र मोदी ज्या 'नव्या भारता'बद्दल बोलत असतात त्याचाच भाग म्हणून या घटना घडत आहेत. या 'नव्या भारता'त माणसापेक्षा पवित्र गाय जास्त महत्त्वाची आहे.

●

## सफाई कामगारांचा विजय

*मुंबईतील सफाई कामगारांना मिळालेल्या न्यायालयीन विजयामधून दिसली सामूहिक वाटाघाटींची ताकद.*

मुंबईतील २,७०० सफाई कामगारांना आता बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये कायमस्वरूपी रोजगार प्राप्त झाला आहे. यासाठी त्यांनी दहा वर्षं कायदेशीर लढा दिला. औद्योगिक लवादापासून सुरू झालेली ही कायदेशीर लढाई मुंबई उच्च न्यायालयात गेली आणि तिथून अखेर सर्वोच्च न्यायालयात पोचली. तीनही पातळ्यांवर कामगारांच्या बाजूनं निकाल लागला आणि प्रत्येक वेळी महानगरपालिकेनं निकालाविरोधात वरच्या न्यायालयात याचिका केली व तिचा पराभव झाला. हा निःसंशयपणे कामगारांचा व 'कचरा वाहतूक श्रमिक संघा'चा विजय आहे. शिवाय, सामूहिक वाटाघाटी व संघटनाबांधणीच्या प्रेरणेलाही यातून पाठबळ मिळालं आहे. भारतातील कामगार संघटनांची चळवळ कमजोर झाली असताना हा विजय मिळणं आणखीच लक्षणीय ठरतं. संघटनेनं काळजीपूर्वक डावपेच आखले आणि एकजुटीसाठी नागरी समाजाशी संवाद साधला तर अपेक्षित परिणाम साध्य होऊ शकतो, हे यातून दिसून आलं. परंतु या कायदेशीर विजयासोबत कामगारांचा संघर्ष संपला आहे, असं म्हणता येणार नाही.

कचरा जमा करणं आणि वाहून नेणं यामुळं या 'अदृश्य' कामगारांना त्वचेचे व श्वसनाचे भीषण आजार होतात. बहुतांश वेळा हे कामगार जातीय उतरंडीच्या सर्वांत खालच्या स्तरातून आलेले असतात. गटार साफ करणाऱ्या कामगारांप्रमाणेच कचरा सफाई कामगारांचं काम मुंबईच्या आणि इतर वेगानं वाढणाऱ्या नागरी केंद्रांच्या दैनंदिन क्रियाशीलतेसाठी अपरिहार्य स्वरूपाचं असतं. परंतु, याच कामामुळं त्यांना समाजाकडून बेदखल केलं जातं. व्यक्ती म्हणून त्यांची दखल घेतली जात नाहीच, शिवाय त्यांच्या कामाचीही दखल घेतली जात नाही. कामाच्या ठिकाणी आणि राहण्याच्या जागेवर सर्व जाणिवा बधीर व्हाव्यात यासाठी यातील अनेक कामगार दारूच्या आहारी जातात. रोजगाराची सुरक्षा नाही, आजाराची सुट्टी नाही, कामावर असताना मृत्यू झाल्यास कुटुंबीयांना नुकसानभरपाई नाही, आणि इतर संघटित सरकारी व नागरी कर्मचाऱ्यांप्रमाणे मिळतो तसा कोणत्याही कल्याणकारी योजनेचा लाभही नाही– अशा अवस्थेत या स्त्री-पुरुषांनी काम करणं अपेक्षित असतं. ही अदृश्यता व मौन दूर व्हावं आणि सफाई कामगारांच्या मागण्यांकडे व संघर्षाकडे जनतेचं व सरकारचं लक्ष जावं यासाठी कचरा वाहतूक श्रमिक संघासारख्या मोजक्या संघटना लढत आहेत. इतर लाभांसोबत किमान वेतनाची हमी सफाई कामगारांना मिळवून देण्यासारखे काही महत्त्वाचे लढे या संघटनेनं यशस्वी केलेले आहेत.

न्यायालयामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेनं असा युक्तिवाद केला की, या कामगारांच्या बाबतीत महानगरपालिका ही मुख्य नोकरदाता नाही, कारण कंत्राटदार सफाई कामगारांना नोकरीवर ठेवतात व पगारही देतात. 'हैदराबाद पॅटर्न' या नावानं परिचित असलेल्या या पद्धतीमध्ये शहरातील प्रत्येक वॉर्डाची आणखी विभागणी केली जाते आणि बिगरसरकारी संस्था व सहकारी संस्थांकडून निविदा मागवल्या जातात. कचरा काढणं, स्वच्छता, कचरा वाहून नेणं याची कंत्राटं या संस्थांना दिली जातात. या कामगारांसोबतचे आपले संबंध 'मालक-नोकर' अशा स्वरूपाचे नाहीत, असं महानगरपालिकेनं सांगितलं. परंतु, कंत्राटदारांकडे स्वतंत्रपणे कोणतंही कौशल्य नसतं वा त्यांची खास वेगळी क्षमताही

नसते, कामगारांचे पगार बृहन्मुंबई महानगरपालिकाच देते, असं कचरा वाहतूक श्रमिक संघानं स्पष्ट केलं. शिवाय, पर्यावरण संरक्षण अधिनियमामध्ये नोंदवलेल्या नियमांनुसार गटारं साफ करणं, घन कचरा दूर करणं, इत्यादी कामं महानगरपालिकेसाठी बंधनकारक आहेत, याकडेही संघानं निर्देश केला. कंत्राटदाराच्या प्रत्येक कृत्यावर महानगरपालिकेचं नियंत्रण असतं, हेही संघानं दाखवून दिलं. कामगारांची भरती वॉर्ड ऑफिसात होते आणि काम नेमून देणं व पर्यवेक्षण इत्यादी प्रक्रियाही महानगरपालिकाच पार पाडते, असं संघानं सांगितलं.

बृहन्मुंबई महानगरपालिकेविरोधातील याचिका दशकभराच्या काळात तीन पातळ्या पार करून शेवटी सकारात्मक निकाल आला, हा कचरा वाहतूक श्रमिक संघापुढील आव्हानाचा केवळ एक भाग आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांची संघटना उभारणं हा श्रमिक संघर्षांमधील बहुधा सर्वांत अवघड भाग आहे. रोजगाराविषयीची असुरक्षितता आणि परिघावरील अस्तित्त्व यांमुळं हे कामगार संघटनेत सहभागी होण्याविषयी भीती बाळगून असतात. एकवेळ संघटनेत ते सामील झाले, तरी त्यांच्या कामाची परिस्थितीच अशी असते की बलवान शक्तींविरोधात दीर्घकाळ संघर्ष करणं त्यांना शक्य होत नाही. अशा वेळी कामगारांमध्ये ऐक्य टिकवून ठेवण्याचं श्रेय कचरा वाहतूक श्रमिक संघाला द्यायला हवं. शिवाय, विद्यार्थी, पत्रकार, आरोग्य व कायदा कार्यकर्ते, चित्रपटकर्ते आणि समाजातील इतर घटकांना आपल्या संघर्षाशी जोडून घेण्याच्या बाबतीतही संघाला चांगलं यश मिळालं. विविध मुद्द्यांवर प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी आणि व्यापक समाजाशी संवाद साधण्यासाठी ही संघटना संकेतस्थळ व ब्लॉग यांचाही वापर करते.

कचरा वाहतूक श्रमिक संघाच्या कायदेशीर विजयामुळं सरकार आणि देशभरातील नागरी प्रशासनाचा ढोंगीपणा उघड झाला आहे. एकीकडे स्वच्छ भारत अभियानाची प्रसिद्धी करणारं सरकार प्रत्यक्षात शहराला स्वच्छ ठेवणाऱ्या कामगारांबाबत असंवेदनशील राहतं. खराटा हातात घेतलेले तारेतारका आणि 'आम्ही देशाला स्वच्छ ठेवत असताना स्वतःची सावली साफ करणारे' अस्ताव्यस्त मंत्री यांच्या 'नौटंकी'कडे या संघटनेनं संकेतस्थळाच्या माध्यमातून लक्ष वेधलं आहे. 'एका वर्गातील नागरिकांची स्वच्छता इतरांना 'गुलामी'त ठेवून साधणार नाही', अशी योग्य टिप्पणी सर्वोच्च न्यायालयानं निकालामध्ये केली आहे. सरकारनं आणि नागरी समाजानं या संदेशाकडे लक्ष द्यायला हवं.

●

## जेनरीक औषधं लिहून देण्यासंबंधी

*डॉक्टरांनी रुग्णांना औषधं लिहून देताना मूळची प्रजातीय नावं वापरावीत, हा नियम योग्य नियोजनातून झालेला दिसत नाही.*

डॉक्टरांनी औषधं लिहून देताना मूळची प्रजातीय (जेनरीक) नावं नोंदवणं अनिवार्य असेल, अशी घोषणा पंतप्रधानांनी केल्यानंतर मोठा गहजब उडाला. ही विचारपूर्वक केलेली कृती नाही, तर सार्वजनिक आरोग्याच्या खऱ्या समस्येपासून आणि गुणवत्ता असलेल्या व सर्वांना परवडण्याजोग्या औषधांची उणीव यांकडे दुर्लक्ष करणारी ही घोषणा आहे.

भारतातील किमान ९० टक्के औषध बाजारपेठेत– एक लाख कोटी रुपये किंवा अधिक

– कंपनीच्या वा ब्रॅण्डच्या नावानं औषधं विकली जातात. अशा विक्री होत असलेल्या ब्रॅण्डेड औषधांना समांतर पुरेशी प्रजातीय नावं नाहीतच. अर्धी बाजारपेठ– ५० हजार कोटी रुपये व अधिक– ही निश्चित डोसांचा संच असलेल्या (फिक्स्ड–डोस कॉम्बिनेशन : एफडीसी) औषधांची आहे, उर्वरीत अर्ध्या बाजारपेठेतील औषधांचा डोस निश्चित स्वरूपाचा नसतो. अनेक एफडीसी औषधांमध्ये आठ वा नऊ औषधं असतात. एफडीसी औषधांमधील घटकांची प्रजातीय नावं लक्षात ठेवणं आणि लिहिणं अव्यवहार्य आहे, कारण एफडीसी औषधांचे अक्षरशः हजारो ब्रॅण्ड आहेत.

एकच घटक असलेल्या औषधांची प्रजातीय नावं लिहिणं डॉक्टरांना शक्य झालं तरी औषधाची विक्री करताना आपल्याला अधिकाधिक नफा मिळेल त्याच ब्रॅण्डचं औषध फार्मासिस्ट विकेल आणि कमी किंमतीच्या औषधांचा किंवा जेनरिक औषधांचा साठाही तो बहुधा ठेवणार नाही. त्यामुळं औषधं ग्राहकांना परवडण्याजोगी बनवण्याचा मूळ हेतूच पराभूत होतो. विशिष्ट औषधांसाठी विक्रेत्यांकडे अनैतिकपणे प्रचार करण्याची पद्धत औषधनिर्मिती उद्योगात रूढ आहे. केवळ डॉक्टरांनी औषधांची नावं प्रजातीय रूपात लिहून दिल्यानं या समस्येचा झोत डॉक्टरांपासून दूर जाईल, एवढंच. परंतु व्यवहार मात्र आधीसारखाच सुरू राहील. उपचारांच्या एकूण खर्चापैकी ५० टक्के ते ८० टक्के खर्च औषधांवर होतो, ही बाब आहे तशीच राहील.

शक्य तितक्या प्रमाणात केवळ प्रजातीय नावांची औषधंच विकणाऱ्या 'जनऔषधी' स्थापन करण्याचं पाऊल भारत सरकारनं उचललं. सरकारी औषधनिर्मिती कंपन्यांनाही यात प्राधान्य देण्यात आलं आहे. पण पुरेशा प्रमाणात या जनऔषधी उपलब्ध नाहीत. आठ लाखांहून अधिक किरकोळ औषधविक्री दुकानं सध्या अस्तित्त्वात आहेत, तर जनऔषधीसंबंधित दुकानांची संख्या बहुधा तीन हजारांपेक्षाही कमी आहे, आणि अनेक ग्रामीण भागांना याचा स्पर्शही झालेला नाही.

जनऔषधींना वाट करून देण्यासाठी औषध तांत्रिक सल्लागार मंडळानं मे २०१६ रोजी 'औषधं व प्रसाधनं अधिनियम, १९४०'मधील नियम ६५(११ए)मध्ये सुधारणा करण्याचा विचार केला होता, जेणेकरून ब्रॅण्ड असलेल्या यादीतील औषधं देण्याऐवजी प्रजातीय नावांची औषधं आणि/किंवा समकक्ष ब्रॅण्डची औषधं विक्रेते रुग्णांना देऊ शकतील. पण प्रजातीय औषधांची जैवउपलब्धता ब्रॅण्ड औषधांइतकी चांगली नसेल, असं सांगत मंडळानं हा कायद्यातील सुधारणेचा विचार फेटाळून लावला. (आवश्यक ठिकाणी कृतिशील होण्यासाठी शरीररचनेच्या अभिसरणात पोचण्याची सक्रिय औषधाची व्याप्ती मोजण्यासाठी जैवउपलब्धता ही संज्ञा वापरली जाते; दोन औषधांमधील– उदाहरणार्थ, प्रजातीय औषधं व ब्रॅण्डेड औषधं– जैवउपलब्धतेची तुलना करण्याला जैवसमतोलता म्हणतात). म्हणजे सरकारी कंपन्यांनी तयार केलेल्या औषधांवर सरकारच्याच औषधसंबंधित निर्णय घेणाऱ्या मंडळाला विश्वास नाही. अर्थात, काही विशिष्ट वर्गातील औषधांचा अभिसरणातील प्रवाहीपणा व मिसळणक्षमता लक्षात घेऊन जैवउपलब्धता/जैवसमतोलता यांसंबंधी जैवसूट देण्याची शिफारस औषध तांत्रिक सल्लागार मंडळ करू शकलं असतं. आरोग्यसेवेचं चांगलं नियमन होत असलेल्या देशांमध्ये याच पद्धतीचा अवलंब केला जातो. डोसनुसार द्याव्या लागणाऱ्या काही तीव्र स्वरूपाच्या औषधांसाठी आणि लघुउपचारांच्या काही औषधांसाठी जैवउपलब्धतता/जैवसमतोलता अभ्यास गरजेचा ठरतो.

प्रजातीय नावाच्या औषधांना स्वीकारार्ह जैवउपलब्धता/जैवसमतोलता असेल का, याविषयी औषध तांत्रिक सल्लागार मंडळाला शंका वाटते. गुणवत्तेविषयीच्या निकषांची कठोर अंमलबजावणी भारतातील नियामक संस्था करतील का, याविषयी बहुधा या मंडळाला विश्वास वाटत नसावा.

तामीळनाडू व राजस्थान राज्य सरकारं वर्षानुवर्षं अतिशय स्पर्धात्मक किंमतीला प्रजातीय नावांची औषधं विकत घेत असतात. गुणवत्ता तपासणी व्यवस्था योग्यरित्या कार्यरत असल्यामुळं या राज्यांच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थांमध्ये अशी कोट्यवधी रुपयांची औषधं वापरात आहेत. प्रजातीय औषधं कधीच चांगली असू शकत नाहीत, या पराभूत मानसिकतेला छेद देण्यासाठी या दोन राज्यांमधील औषध खरेदी व्यवस्थेच्या यशाचा विचार करायला हवा. देशभरातील प्रजातीय औषधांच्या गुणवत्तेची खातरजमा करण्यातील आव्हानं कमी लेखावीत, असा याचा अर्थ नव्हे. परंतु, ब्रॅण्डेड औषधांच्या तुलनेत प्रजातीय औषधांमध्ये जैवउपलब्धतेची वानवा असते, अशी चुकीची माहिती औषधनिर्मिती उद्योगाकडून पसरवली जात आहे. या माहितीच्या प्रसाराचं माध्यम बनून वैद्यकीय व्यवसायातील प्रजातीय औषधांचे टीकाकार गरीब रुग्णांशी प्रतारणा करत आहेत.

डॉक्टरांच्या आचारसंहितेमध्ये ऑक्टोबर २०१६मध्ये केलेल्या सुधारणेत भारतीय वैद्यकीय परिषद (मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया : एमसीआय) म्हणते, '(प्रत्येक डॉक्टरानं) वाचनीय अक्षरांमध्ये प्रजातीय नावांची औषधं लिहून द्यावीत... औषधं पुरेशा प्रमाणातच लिहून दिली जातील व तसाच त्यांचा वापर होईल, याची खातरजमाही तिनं/त्यानं करून घ्यायला हवी'. परंतु अशी खातरजमा करण्यासाठी कोणतीही चौकटच अस्तित्त्वात नसताना हे कसं घडेल, ते ही परिषदच जाणो!

आवश्यक प्रमाणातील वापर व औषधयोजना हे डॉक्टर, औषधविक्रेता, नियामक व ग्राहक यांच्यावर अवलंबून आहे. आवश्यकतेएवढाच वापर व्हावा, यासाठी पुढील किमान पूर्वअटी पूर्ण करायला हव्यात :- केवळ डॉक्टरांनी लिहून देण्यासाठीच असलेली औषधं (सूची जी, एच, एच-१ व एक्स) काउन्टरवर मुक्तपणे उपलब्ध असू नयेत; अँटीबायोटिक व इतर गंभीर औषधांचा गैरवापर होणार नाही, याची खातरजमा करून घेण्याचं काम डॉक्टरांनी व त्यांच्या व्यावसायिक संस्थांनी नियामकांच्या सोबतीनं करावं; एफडीसी व अवैज्ञानिक एकघटकीय औषधांमधील अवाजवी/हानिकारक/निरुपयोगी औषधं काढून टाकली जातील, असं पाहायला हवं. औषधांचा वाजवी वापर व योजना यांसाठीच्या व्यावहारिक मार्गदर्शक तत्त्वांची मांडणी करून त्याची सर्व डॉक्टरांनी गांभीर्यानं अंमलबजावणी करायला हवी. पेटन्ट नसलेल्या औषधांना ब्रॅण्ड देण्याची पद्धत बंद केली पाहिजे. हाथी समितीच्या अहवालातही (१९७५) अशा ब्रॅण्डना पुसून टाकण्याची शिफारस करण्यात आली होती.

सर्वोच्च न्यायालयानं २००३ साली आवश्यक व जीवनदायी औषधांच्या विस्तारित यादीच्या किंमतीवर नियंत्रण ठेवणं बंधनकारक केलं. 'औषध किंमत नियंत्रण आदेश, २०१३' यातून उभी राहिलेली सध्याची बाजारपेठआधारीत किंमत यंत्रणा म्हणजे विटंबना आहे आणि दोन हजार टक्के ते तीन हजार टक्के (काही वेळा तर १० हजार टक्के) नफ्याचं प्रमाण ठेवणाऱ्या किंमतीही या यंत्रणेत सहज बसतात. 'औषध किंमत नियंत्रण आदेश, १९९५'मधील किंमतनिश्चिती पद्धत पुन्हा लागू

**(पान ५६ वर पाहा)**

चालवण्यासाठी त्यांना अधिक फंडींग लागते. स्वतःचे स्त्रोत तयार करण्याचे काम महाकठीण खरेच, पण सहजपणे मिळणाऱ्या फंडींगमुळे त्याचे गांभीर्यदेखील त्या संस्था चालकांच्या लक्षात येत नाही. सतत फंडींग देणाऱ्या संस्थांकडे डोळे लावून बसणे, एक प्रकल्प संपायच्या आधीच दुसऱ्या प्रकल्पाच्या चिंतेने ग्रासणे, फंडींग एजन्सींचे जे प्राधान्यक्रम असतील त्या क्षेत्रातच काम करावे लागणे हे आयुष्यभर करत बसावे लागते.

ज्या राष्ट्रात वा अर्थव्यवस्थेत जागतिक भांडवलाला मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करायची आहे, त्या राष्ट्रातील राजकीय असंतोषाचा मुद्दा फक्त त्या यजमान राष्ट्रातील शासन व्यवस्थेवर टाकणे जागतिक भांडवलाला परवडणारे नसते. कारण त्याने कोट्यावधी डॉलर्सचे स्टेक लावलेले असतात. एका बाजूला आपल्या विशिष्ट आर्थिक संरचनेतून सामान्य लोकांचे आयुष्य बिकट होइल हे भांडवलदारांना कळत असते; फक्त ते सहनीय कसे होईल, त्याचे पर्यवसान राजकीय असंतोषात व त्यातून भांडवल विरोधातल्या राजकीय चळवळीत होणार नाही हे त्याला बघावे लागते. त्यामुळे खऱ्या खुऱ्या ज्वलंत प्रश्नांचे बिगरराजकीयीकरण होणे त्याच्या पथ्यावर पडणारे असते.

एनजीओज्नी कितीही जहाल भाषा वापरली तरी त्यांना फंडींग एजन्सी फारसा जाब विचारत नाहीत. काही प्रसंगी एनजीओज्नी केलेल्या आंदोलनांना हिंसक वळण लागलेले आहे. पण प्रस्थापित व्यवस्था व फंडींग एजन्सीज निर्धास्त असतात कारण त्यातून प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देणाऱ्या राजकीय शक्तींना पाठबळ मिळणार नाही याची खबरदारी त्यांनी आधीच घेतलेली असते.

बिगर राजकीय याचा अर्थ असा की एनजीओज्च्या कार्यकर्त्यांना सत्ता ताब्यात घेण्याची मुळात आकांक्षाच नसणे. याचा अर्थ असा की फक्त एकाच प्रश्नावर, सुटे सुटे काम केल्यामुळे प्रस्थापित व्यवस्थेने दखल घ्यावी अशी राजकीय ताकद उभी न रहाणे. त्यामुळे एनजीओचे संस्थापक किती राजकीय विचार करतात, किंवा किती राजकीय परिभाषा वापरतात यावर एनजीओज्चे मॉडेल राजकीय इम्पॅक्ट पाडू शकणार की नाही हे अवलंबून नसणार आहे. केजरीवालांचा प्रयोग सर्वार्थाने वेगळा ठरतो हे मान्य. पण एका महानगरात यशस्वी झालेला हा राजकीय प्रयोग मोठ्या राज्यांच्या पातळीवर कितपत यशस्वी होईल याबद्दल शंका वाटते. एनजीओमधून लोकशक्ती तयार होऊन राजकीय सत्ता ताब्यात घेता येते हे मानणे कठीण जाईल. मुळात राजकीय अर्थव्यवस्थेशी संबंधित असणाऱ्या प्रश्नांचे बिगर राजकीयीकरण करणे ही व्यूहनीती असणार आहे व त्यासाठी एनजीओज् हे एक संघटनात्मक हत्यार आहे. परदेशी भांडवल ज्या प्रमाणात येणार त्या प्रमाणात परदेशी मदतीचा ओघदेखील वाढत जाणारा असतो. ●

---

**(जेनरीक औषधं... पान १८ वरून)**

करण्याची गरज आहे.

मोफत औषधांचं तामीळनाडू/राजस्थान या राज्यांमधलं प्रारूप सर्व राज्यांमध्ये लागू करणं आणि सरकारी औषधनिर्मिती कंपन्यांना पुनरुज्जीवित करण्यासाठी सरकारनं त्यात गुंतवणूक करणं, हा यासंबंधीचा अग्रक्रम असायला हवा. ●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे.
(२२, २९ एप्रिल व ६ मेच्या अंकांतून)